# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,

कृषि नगर, वसमत रोड,

परभणी-४३१४०२ (महाराष्ट्र)

| | | | |
|---|---|---|---|
| ई-मेल | : reg_mau@rediffmail.com | दूरध्वनी | : (०२४५२) २२९७५५ |
| वेबसाईट | : www.vnmkv.ac.in | फॅक्स | : (०२४५२) २२९७५५, २२३५८२ |


वाचा:-१. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.वेपुर-११२५/प्र.क्र.०१/सेवा-९ दिनांक ०२ जून, २०२५.

२. कृषि.प.दु.वि.व.म.विभाग,यांचे पत्र क्र.संकीर्ण-१५२५/प्र.क्र.१४०/६-अे, दिनांक २३ जुन,२०२५.

**वेतनत्रुटी निवारण समिती-२०२४ च्या अहवालामधील वेतनश्रेण्यांविषयक व आनुषंगीक शिफारशी स्वीकृत करण्याबाबत.**

## परिपत्रंक

जा.क्र.२०२५/प्र.क्र.४०१/वेतनत्रुटी/आस्थ-८/3507

दिनांक २९.०८.२०२५.

शासन निर्णयान्वये शासनाने वेतनत्रुटी निवारण समिती-२०२४ नुसार समितीच्या शिफारशी स्विकृत करून शासन निर्णया सोबतचे जोडपत्र-१ मध्ये नमूद विद्यापीठांतील खालील संवर्गाची वेतनश्रेणी सातव्या वेतन आयोगामध्ये सुधारीत केलेली आहे.

| अ. क्र. | संवर्गाचे नाव | ७ व्या वेतन आयोगानुसार वेतनस्तर | वेतनत्रुटी समितीच्या शिफारशी/शासन निर्णयात नमूद केल्यानुसार ७ व्या वेतन आयोगातील सुधारीत वेतनस्तर |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | शाखा अभियंता | एस-१५: ४१८००-१३२३०० | एस १६: ४४९००-१४२४०० |
| २ | कनिष्ठ अभियंता | एस-१३: ३५४००-११२४०० | एस-१५: ४१८००-१३२३०० |
| ३ | कार्यदेशक पर्यवेक्षक | एस-१०: २९२००-९२३०० | एस-१३: ३५४००-११२४०० |
| ४ | नळकारागीर | एस-६:१९९००-६३२०० | एस-८: २५५००-८११०० |

करिता उक्त संवर्गातील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना सुधारीत वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय करतांना शासन निर्णयातील अटी व शर्तीचे तंतोतंत पालन करावे.

१. सुधारीत वेतन स्तर दि. ०१ जानेवारी, २०१६ पासून काल्पनीक रित्या मंजूर करण्यात यावेत आणि प्रत्यक्ष अर्थिक लाभ दि. ०१ जून, २०२५ पासून देण्यात यावेत, मात्र दि. ०१ जानेवारी, २०१६ पासून दि. ३१ मे, २०२५ पर्यंत कुठल्याही संवर्गाला वरील शिफारशीमुळे थकबाकी अनुज्ञेय ठरणार नाही.

२. उक्त संवर्गातील जे कर्मचारी दि. ०१ जानेवारी, २०१६ पासून ते दि. ३१ मे, २०२५ या कालावधीत सेवानिवृत्त झाले असतील, त्या कर्मचा-याची दि. ०१ जानेवारी, २०१६ पासून सुधारीत वेतनसंरचनेत काल्पनीक वेतन निश्चिती करण्यात यावी. दि. ०१ जानेवारी, २०१६ ते संबंधीत कर्मचा-यांच्या सेवानिवृत्तीच्या दिनांका पर्यंतच्या कालावधीत अनुज्ञेय वेतनवाढी विचारात घेवून निवृत्ती वेतन सुधारीत करण्यात यावे. सुधारीत निवृत्ती वेतनाचे प्रत्यक्ष लाभ दि. ०१ जून, २०२५ पासून देण्यात यावेत, त्यापुर्वीची थकबाकी अनुज्ञेय असणार नाही.

मा. कुलगुरू महोदय, यांचे मान्यतेने.

29/8/25

(संतोष वेणीकर)
**कुलसचिव**

प्रतिलीपी:- माहितीस्तव व कार्यवाहिस्तव.

१. संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि), वनामकृवि, परभणी.

२. संचालक संशोधन, वनामकृवि, परभणी.

३.संचालक विस्तार शिक्षण, वनामकृवि, परभणी.

४. नियंत्रक, वनामकृवि, परभणी.

५. विद्यापीठ अभियंता, वनामकृवि, परभणी.

६.सर्व आहरण व संवितरण अधिकारी, वनामकृवि, परभणी.

७. उपकुलसचिव, (प्रशासन), कुलसचिव कार्यालय, वनामकृवि, परभणी.

प्रत,

१.कृषि,पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, दालन क्र.५३५, मंत्रालय विस्तार भवन हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग मंत्रालय, मुंबई-४०००३२ यांना माहितीस्तव.

२. प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन युनिट, वनामकृवि, परभणी यांना माहितीस्तव देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेस्थळावर प्रसारीत करावे.

३. मा. कुलगुरू महोदय, यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी.